# पंचधारा

वर्ष ६५ वे, अंक दुसरा
जुलै २०२३ ते सप्टेंबर २०२३
अधिक श्रावण ते भाद्रपद १९४४

## माध्यमांतर आणि प्रकारांतर विशेषांक



मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य, हैदराबाद

RNI Reg. No. 32307/79

मूल्य : १२५/-

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पुरस्कृत
मराठी साहित्य परिषद, (तेलंगण राज्य) या संस्थेचे त्रैमासिक मुखपत्र

# पंचधारा

## माध्यमांतर आणि प्रकारांतर विशेषांक

वर्ष ६६ वे, अंक दुसरा
जुलै २०२३ ते सप्टेंबर २०२३
आषाढ ते भाद्रपद १९४५

**संपादक मंडळ**

डॉ. विद्या देवधर (प्रमुख संपादक)
माधव रामराजे चौसाळकर
डॉ. शैलजा जोशी
मीना जहागिरदार
व्यंकटेश कुलकर्णी
डॉ. गायत्री शिरोळे
या अंकासाठी संपादन सहाय्य : प्रा. चिन्मय मधू घैसास

**मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य**
इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७
RNI Reg. No. : 32307/79

कार्यवाह
म. सा. प. तेलंगण राज्य
४-६-४५८, इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७.
**भ्रमणध्वनी :** ७८४२८५३९८४
(संपर्क : सायंकाळी ५ ते ८) अन्यवेळी लिखित संदेश पाठवावे.

प्रकाशक
डॉ. विद्या देवधर

**सर्व हक्क :** म. सा. प. तेलंगण राज्य

या अंकात प्रकट झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.
फक्त एक व तीन वर्षांची वर्गणी स्वीकारली जाईल.
पंचधारेच्या आर्थिक व्यवहाराचे वर्ष एप्रिल ते मार्च असे आहे.
सर्व सभासदांनी आपले E-mail ID फोन नंबर
पुढील क्रमांकावर पाठवावेत. ७८४२८५३९८४
संपर्कासाठी : MAIL ID : mspaphydgmail.com

पंचधारा वर्गणी Marathi Sahity Parishad
IDBI Bank, Kachiguda Branch
A/C. No. 59410010000125 किंवा Panchdhara
A/C. No. 59410010001359, IFSC Code – IBKL0000594
(For both accounts) या खात्यावर जमा करावी. मनीऑर्डर पाठवू नये.

वार्षिक वर्गणी रु. ४००/-
तीन वर्षांची वर्गणी रु. १०००/-
आजीव सदस्य वर्गणी रु. ४०००/-
(वर्गणी शक्यतो डी. डी. ने पाठवावी)
बाहेरगावचा चेक असल्यास वटणावळीचे रु. ३५/- अधिक पाठवावेत, ही विनंती
या अंकाचे मूल्य : रु. २००/-
टपाल खर्च : रु. ३५/-

अक्षरजुळणी व मुखपृष्ठ : अमोघ आर्ट्स, पुणे ३०.

मुद्रक : श्रीगणेश मुद्रणालय, ३५७, शनिवार पेठ, पुणे ३०.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या अंकात प्रकट झालेल्या मतांशी आणि निष्कर्षांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका

संपादकीय ........................................................................................ ५

भावपूर्ण श्रद्धांजली :
मला भावलेल्या मालिनीताई राजूरकर ................ भारत देगलूरकर .................. ९

माध्यमांतराच्या अध्यापन-संशोधनातील अडचणी... प्रा. चिन्मय मधू घैसास
डॉ. योगेश शेळके ............. १४

रंग किरमिजी :
काव्य ते गीत : सर्जनाचा चिद्विलास ................. प्रवीण दवणे ..................... १९

मराठी कादंबरीचे चित्रपट माध्यमांतर ................. डॉ. राजेंद्र थोरात .............. २३

पेशवाईवर आधारित ऐतिहासिक
कादंबऱ्यांचे प्रकारांतर आणि माध्यमांतर ............ डॉ. विनय मडगांवकर.......... ३३

ग्रामीण कादंबऱ्यांचे माध्यमांतर :
(निवडक कादंबऱ्यांच्या संदर्भात) ..................... प्रा. विनायक ल. बापट ........ ४७

लोककला आणि लोकसमजुतींवर आधारित
कादंबऱ्यांचे माध्यमांतर : (चंद्रमुखी आणि जोगवा
चित्रपट यांच्या विशेष संदर्भात) ....................... प्रा. जयेश गावकर.............. ५७

'महानंदा' कादंबरीचे माध्यमांतर :
नाटक : गुंतता हृदय हे ................................ हेमंत बाळकृष्ण अय्या ......... ६९

माध्यमांतरातील आधुनिक आयाम :
कादंबरी ते वेबसेरिज .................................. तन्वी चाफाडकर .............. ७८

चरित्र-आत्मचरित्रात्मक साहित्यकृतींचे माध्यमांतर .. प्रा. चिन्मय मधू घैसास ........ ८६

चरित्र ग्रंथावरून चित्रपटनिर्मिती :
एक आनंददायी अनुभव ............................... डॉ. विद्या देवधर .............. ९६

नाटक ते सिनेमा : माध्यमांतर ........................ डॉ. गायत्री शिरोळे ........... १०६

कथेचे माध्यमांतर : 'जगावेगळा संसार'
या कथेच्या अनुषंगाने .................................. पूर्वा पंडित वस्त ............. १११

वरनभात लोन्चा नि कोन नाय कोन्चा :
कथेचे माध्यमांतर........................................ रोहिणी नेवरेकर .............. १२०

व्हिक्टर ह्यूगोच्या साहित्याचे माध्यमांतर ............ क्षमा धारवाडकर ............ १२८

पुस्तक परीक्षण :

१ 'दीपस्तंभ' : एक महत्त्वपूर्ण दस्तावेज ...... डॉ. शुभांगी पातुरकर ......... १३५
२ मंतरलेली उन्हे .................................... प्रा. हिरा वाघ ................ १३९
३ युगभान जागवणारी कविता .................. अंजली कुलकर्णी ............ १४२

मराठी साहित्य परिषद कार्यवृत्त .................................................... १४७

लेखक परिचय ........................................................................ १५०

स्वागत नव्या पुस्तकांचे .............................................................. १५५

■

# चरित्र-आत्मचरित्रात्मक साहित्यकृतींचे माध्यमांतर



प्रा. चिन्मय मधू घैसास

## प्रस्तावना

जीवनाचा वेध घेणे हे साहित्याचे आणि माध्यमाचे महत्त्वाचे उद्दिष्ट असते. कथा, कादंबरी, प्रवासवर्णन, व्यक्तिचित्रण यासारख्या साहित्यप्रकारांतून लेखक आपला विचार वाचकांसमोर मांडत असतो. मात्र, जेव्हा एखाद्या सर्जनशील वृत्तीच्या आणि नाविन्यपूर्ण मांडणी करू पाहणाऱ्या व्यक्तीला लेखकाने मांडलेल्या गोष्टींच्या पलीकडे काहीतरी दाखवावयाचे असते तेव्हा याच लिखित साहित्यकृतीचे प्रकारांतर वा माध्यमांतर करण्याची गरज त्याला भासते. लिखित साहित्यकृतीच्या तुलनेत चित्रपट अधिक प्रभावी ठरतो त्याचे कारण म्हणजे त्यात असणारा दृश्यात्मकतेचा भाग. Seeing is believing या न्यायाने, प्रत्यक्ष होऊन गेलेल्या एखाद्या व्यक्तीचे चित्रण चित्रपटाच्या माध्यमातून अधिक प्रभावी ठरते. याच कारणामुळे चरित्र आणि आत्मचरित्र या साहित्यप्रकारांचे माध्यमांतर अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात होऊ लागले आहे.

समाजात आपला विशिष्ट असा ठसा उमटवून गेलेल्या व्यक्तीच्या जीवनाचा वेध घेणारा चित्रपट नेहमीच प्रेक्षकांसाठी उत्सुकतेचा विषय ठरत असतो. आपल्या परिचयातील आणि माहितीतील व्यक्तीच्या संदर्भातील वाचलेल्या गोष्टींपेक्षा चित्रपटात वेगळे काय दाखवण्यात आले आहे याची उत्कंठा देखील प्रेक्षकाला असते. मुळातच कोणत्याही एखाद्या व्यक्तीविषयी अधिक जाणून घेण्याची मानवी वृत्ती या सर्वांच्या मुळाशी असतेच. त्यात ती व्यक्ती नामवंत आणि उल्लेखनीय असल्यास त्या व्यक्तीच्या लोकप्रियतेमुळे माध्यमांतरित चित्रपट अधिक महत्त्वाचा ठरतो.

## डॉ. प्रकाश बाबा आमटे

'प्रकाशवाटा' या आत्मचरित्रावर आधारित चित्रपट म्हणजे 'डॉ. प्रकाश आमटे - द रियल हिरो'. कुष्ठरुग्ण आणि त्यांचे पुनर्वसन यासाठी कार्य केलेल्या डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या जीवनकार्याचा वेध घेणारा हा चित्रपट! कुष्ठरोग्यांच्या

जीवनामध्ये जगण्याची आशा निर्माण करण्याचे अतिशय महत्त्वाचे कार्य बाबा आमटे आणि साधनाताई यांनी केले. हाच प्रवास डॉ. प्रकाश आणि त्यांच्या अर्धांगिनी डॉ. मंदा यांनी पुढे नेला. १० ऑक्टोबर २०१४ या दिवशी हा चित्रपट प्रदर्शित करण्यात आला. नाना पाटेकर, सोनाली कुलकर्णी, मोहन आगाशे, तेजश्री प्रधान तसेच २०० गोंड आदिवासी कलावंतांनी अभिनय केला आहे. सामाजिक भान असणारे हे कलाकार असल्याने त्यांच्या अभिनयातून त्यांनी साकारलेल्या व्यक्तिरेखेची ओळख निश्चितपणे अधोरेखित होते.

हा चित्रपट म्हणजे डॉ. प्रकाश आमटे यांचे चरित्रचित्रण म्हणावे लागेल. हेमलकसातील आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्याचे महत्त्वाचे कार्य बाबा आमटे आणि त्यानंतर डॉक्टर प्रकाश आमटे यांनी केले. गडचिरोली जिल्ह्यातल्या एका डोंगराळ भागात, वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी डॉ. प्रकाश आमटे आणि डॉ. मंदाकिनी आमटे, आपले शहरातले सुखी जीवन सोडून हेमलकसामध्ये आपल्या सहकाऱ्यांसोबत येतात त्याची ही कथा आहे. हेमलकसा परिसरात राहणारे आदिवासी भूक, रोगराई, अंधश्रद्धेच्या विळख्यात अडकले होते. पोलिसांचा होणारा अत्याचार आणि नक्षलवादाकडे वळलेले आदिवासी, या आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य करणारे आमटे कुटुंबीय, त्यांना येणाऱ्या अडचणी, त्यांची दुर्दम्य इच्छाशक्ती, जिद्द यातून हेमलकशामध्ये ज्ञानाचे नंदनवन त्यांनी कसे फुलवले हे चित्रपटात प्रामुख्याने दिसून आले आहे. डॉ. प्रकाश आमटे यांची भूमिका करणारे नाना पाटेकर, डॉ. मंदाकिनी आमटे यांची भूमिका करणाऱ्या सोनाली कुलकर्णी आणि बाबा आमटे यांची भूमिका साकारणारे डॉ. मोहन आगाशे यांनी आपापल्या भूमिकेला योग्य न्याय दिलेला दिसून येतो. 'तू बुद्धी दे तू शक्ती दे, नवचेतना विश्वास दे' या प्रार्थनागीतातून डॉ. प्रकाश बाबा आमटे यांचे विचार आणि आपल्या कार्याविषयीचा दृष्टिकोन दिसून येतो.

हेमलकसा सारख्या दुर्गम परिसरामध्ये राहत असताना एखाद्या व्यक्तीला कोणकोणत्या आव्हानांचा सामना करावा लागू शकतो हे या चित्रपटातून दिसून येते. आदिवासींना शेती, फळभाज्या उत्पादन त्याचप्रमाणे वनसंरक्षण, रुग्ण उपचार यासारख्या गोष्टींदेखील डॉ. प्रकाश बाबा आमटे यांनी हेमलकसा परिसरामध्ये शिकवल्या; त्याचीही ओळख या चित्रपटातून प्रेक्षकांना होते. त्यांच्या याच कार्याचा परिणाम म्हणून हेमलकसा भागातील अनेक व्यक्ती आज उच्चपदस्थ अधिकारी आणि सन्माननीय व्यक्ती म्हणून समाजात वावरत आहेत हाही एक महत्त्वाचा बोध या चित्रपटातून मिळतो.

चित्रपट माध्यम म्हणून विचार करताना या चित्रपटात काही मुद्दे जाणवतात. डॉ. आमटे यांच्याकडे अभ्यास दौऱ्यासाठी आलेल्या परदेशी पाहुण्यांना सोडून ते पोलीस ठाण्यात जातात परंतु पुन्हा अभ्यासकांकडे परतत नाहीत. आमटे मुंबईत जातात तेव्हा काय घडते याचेही उत्तर चित्रपटात मिळत नाही. काही प्रसंगांमध्ये मातीचे तर काही प्रसंगांमध्ये साधे परंतु सिमेंटचे घर आपणास दिसून येते. आपणासमोर कोणत्याही अडचणी निर्माण झाल्या आणि कितीही संकटे आली तरी डगमगून न जाता त्याला धैर्याने कसे सामोरे जावे याचा वस्तुपाठ म्हणजे डॉ. प्रकाश बाबा आमटे यांचे जीवन; हा विचार स्पष्ट करण्यासाठी या चित्रपटाची मांडणी झालेली पाहावयास मिळते.

**मी सिंधुताई सपकाळ**

दुर्दैवाच्या भोवऱ्यात सापडलेल्या जीवनाच्या जळत्या निखाऱ्यावरून चालणाऱ्या रणरागिणी म्हणजे सिंधुताई सपकाळ. हजारांची माता होऊन समाजसेवेचे व्रत हाती घेऊन अनेक अनाथांना ज्यांनी मातृत्वाचे छत्र प्राप्त करून दिले अशा सिंधुताई सपकाळ! त्यांच्या जीवनातील घटनांचे सादरीकरण 'मी वनवासी' या त्यांच्या आत्मचरित्रावर आधारित 'मी सिंधुताई सपकाळ' या चित्रपटात करण्यात आलेले आहे. बालविवाह, स्त्री म्हणून वाट्याला आलेली दुःखे, गरोदर असताना आलेला एकटेपणा, त्यानंतरची परवड आणि असंख्य अनाथांची आई बनलेल्या सिंधुताईंची कहाणी या चित्रपटात पाहावयास मिळते. २०१० या वर्षी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाची मांडणी ही फ्लॅशबॅक तंत्राद्वारे झालेली आहे. अमेरिकेतील एका व्याख्यानाच्या निमित्ताने आपल्या आयुष्यातील सर्व घटनांचे वर्णन सिंधुताई करतात अशा पद्धतीने ही मांडणी चित्रपटात आलेली आहे.

या चित्रपटातील वेगवेगळ्या घटनाप्रसंगांतून सिंधुताईंच्या आयुष्यातील घटना शक्य तेवढ्या जिवंतपणे सादर करण्याचा प्रयत्न झालेला आहे. वडिलांना पुरणपोळी खाऊ घालण्याचा प्रसंग, गोठ्यात नाळ तोडण्याच्या प्रसंगात गाईंना होणारी जाणीव, स्मशानातील दृश्य, अशा मोजक्या परंतु प्रभावी गोष्टींतून सिंधुताईंच्या आयुष्यातील दुर्दैव चित्रपटातून मांडण्यात आलेले आहे. गावातली घरे, रस्ते, सारवलेल्या जमिनी, तुळशीवृंदावन या गोष्टी संबंधित परिस्थितीची समर्पक जाणीव करून देतात. नुकत्याच जन्मलेल्या बाळाला आंघोळ घालणे, स्मशानात ठेवलेल्या तांदळाची भाकरी भाजणे, गोठ्यात स्वतःची नाळ स्वतः कापणे असे अनेक प्रसंग या चित्रपटात व्यक्त झालेले आहेत. सिंधुताईंच्या आयुष्याशी जोडलेल्या अनेक

व्यक्तींच्या आयुष्यांचा प्रवास असे या चित्रपटाकडे आपण पाहू शकतो. जन्मभर छळ करणारा नवरा म्हातारपणी सिंधुताईकडे परत येतो परंतु त्याला नवऱ्याच्या रूपात नव्हे तर एका बाळाच्या रूपात सिंधुताई स्वीकारतात. यातून सिंधुताईमधील 'आई' या चित्रपटात दर्शविण्यात आलेली आहे.

साहित्यकृतीच्या तुलनेत चित्रपटामध्ये काही बदल झाल्याचे आपणास दिसून येते. उदाहरणार्थ, जेव्हा सिंधुताई आपल्या मुलीला घेऊन इकडेतिकडे भटकत असतात तेव्हा तिला भूक लागलेली असते परंतु जवळ खाण्यासाठी काहीच नसते. तेवढ्यात एक कुत्रा तोंडात कागदाची पुडी घेऊन त्या ठिकाणी येतो. त्या पुडीत जिलेबीचा मैदा असतो. पानाच्या द्रोणात ओढ्याचं पाणी घेऊन त्याच कागदात ते पीठ भिजवलं जातं आणि हात शेकायला जळत ठेवलेल्या लाकडाच्या निखाऱ्यावर ते भाजलं असा प्रसंग आत्मचरित्रात सांगितलेला आहे. परंतु चित्रपटात मात्र जळणाऱ्या प्रेताजवळ पिंडासाठी ठेवलेल्या पिठाची भाकरी त्याच कोळशावर भाजून खाल्याचे दाखवले आहे. अशा तऱ्हेचा बदल त्या प्रसंगाची गंभीरता, हृदयद्रावकता प्रेक्षकांच्या लक्षात आणून देण्यासाठी करण्यात आलेला असतो. साहित्यकृतीतील मुद्दे दृश्य स्वरूपात ज्यावेळेस प्रेक्षकांच्या समोर येतात तेव्हा त्याची दाहकता अधिक प्रभावीपणे जाणवत असते.

### ७२ मैल - एक प्रवास

सातारा ते कोल्हापूर दरम्यान तीन दिवसांच्या ७२ तासांच्या प्रवासात राधाक्काच्या सहवासात लेखकाच्या बालमनाला जीवनाचे जे विदारक दर्शन घडले त्याचा मन थरकापून टाकणारा अनुभव म्हणजे '७२ मैल' ही कादंबरी. या कादंबरीतून लेखकाने आपल्या आयुष्यातील एक अत्यंत महत्त्वाचा प्रसंग चित्रित केलेला आहे. त्यामुळे या कादंबरीचा आत्मचरित्रात्मक कादंबरी अशा अर्थाने देखील विचार करता येणे शक्य आहे. ७२ मैल या कादंबरीत अनेक पात्रे आहेत परंतु चित्रपटात मात्र दिग्दर्शकांनी काही पात्रे वगळलेली दिसून येतात. साहित्यकृतीत राधाक्काची सहा मुले म्हणजेच दोन मुली बाईजी आणि भीमा तर चार मुलगे विठ्ठल, राणू, चंद्र आणि सुंदर हे आहेत. परंतु चित्रपटात फक्त चारच मुले म्हणजे दोन मुली बाईजी व भीमा आणि दोन मुलगे सुंदर आणि राजू एवढेच दाखवलेले आहेत. या चित्रपटातील घटनाप्रसंगांचे वर्णनही तपशीलवार झालेले दिसून येते. लेखकाचे बोर्डिंगमधून पलायन, एस.टी. स्टँडवर कोल्हापूरला जाण्यासाठी लेखकाची धडपड, राधाक्का व तिच्या मुलांशी लेखकाची झालेली भेट, लेखकाचा व राधाक्काच्या कुटुंबाचा संपूर्ण प्रवास, त्या प्रवासातील त्यांचे अनुभव, त्यांची झालेली वाताहत, सुंदर आणि राणू यांचा मृत्यू, राधाक्काच्या चारित्र्याच्या संदर्भात तिच्यावर

दृश्यांच्या आधारे आणि गाण्यांच्या आधारे कथानक फुलवता येते. उदाहरणार्थ, इंद्रधनू या गाण्यातून घाणेकर चित्रपटात काम करताना दाखवले गेले आहे. दिवस पुढे जात आहेत हे देखील समजते, तसेच या गाण्यातून कांचनच्या भावनांचे प्रगटीकरण देखील होते.

## श्यामची आई

श्यामची आई या चरित्रात्मक ग्रंथात साने गुरुजींनी आपल्या आयुष्यातील आठवणी सांगताना आपल्या आईचे स्वभाववैशिष्ट्य, तिने केलेली त्यांची जडणघडण आणि आयुष्यात दिलेला उपदेश यांची वर्णने केली आहेत. या ग्रंथातील कथा श्यामभोवती फिरताना दिसत असली तरी त्यांचा केंद्रबिंदू आई हाच आहे. कर्तव्य, परोपकार, जीवनाविषयीचा दृष्टिकोन, व्यक्तिमत्त्व विकास, मातृत्व, प्रेम, निर्मळता, संस्कार हे मुद्दे या ग्रंथात स्पष्ट झालेले आहेत. माणूस म्हणून जगण्याची खरी वाट आणि चांगल्या वाईटाची पारख करण्याची दृष्टी या ग्रंथातून वाचकांना मिळते. या पुस्तकाचे माध्यमांतर करताना अनेक घटना-प्रसंग वगळण्यात आले आहेत वा बदलण्यात आले आहेत. उदाहरणार्थ, श्यामच्या वडिलांना चोर पकडतात तेव्हा एक म्हातारी मोठ्याने ओरडते आणि लोकांना बोलावते. तेव्हा ते चोर पळून जातात मात्र चित्रपटात श्यामचे वडील त्या चोरांना त्यांच्या मुलांची शपथ घालतात आणि स्वतःची सुटका करून घेतात असे दाखवण्यात आले आहे. श्याम फुलांच्या कळ्या तोडून घेऊन आला आहे हे कादंबरीत आईला आधीच माहीत असते असे आले आहे परंतु चित्रपटात तीच गोष्टी आईला नंतर कळल्याचे दाखवले आहे.

चित्रपट माध्यमाच्या चौकटीला अनुसरून संवाद आणि भाषाशैलीत बदल केला आहे. कादंबरीत आलेले वर्णनात्मक संवाद चित्रपटात वगळले आहेत. पात्रे देखील कमी अधिक झाली आहेत. कादंबरीत श्यामच्या बहिणीचा उल्लेख मोठ्या प्रमाणात आहे परंतु चित्रपटात बहिणीचा उल्लेख नाही. आईचा स्वभाव फार कठोर, संतापी, रागीट असा कादंबरीत आहे तर चित्रपटात मात्र आई फार कठोर वागताना दिसत नाही. कादंबरीत आईच्या शेवटच्या क्षणी मांजराचा उल्लेख आहे परंतु चित्रपटात मात्र तो नाही. चित्रपटात गाण्यांच्या मदतीने महत्त्वाचे प्रसंग दर्शविले आहेत. त्यांच्या माध्यमातून संबंधित प्रसंगातील आनंद, दुःख इ. भावना लक्षात येतात. कादंबरीत ओव्यांचा वापर केला आहे, त्याच्या जागी चित्रपटात गीत-संगीताचा वापर केला आहे.

**आनंदी गोपाळ**

आनंदी गोपाळ या कादंबरीचे माध्यमांतर त्याच नावाने चित्रपटात करण्यात आले आहे. कादंबरीचे लेखक श्री. ज. जोशी आहेत आणि १९७० साली त्या पुस्तकाचे प्रकाशन झाले; तर चित्रपट २०१९ साली प्रदर्शित झाला आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन समीर विद्वांस यांनी केले आहे. यमुना जोशी ते आनंदीबाई असा लहानपणापासून डॉक्टर होईपर्यंत आनंदीबाईच्या जीवनाचा संघर्ष मांडण्याचा प्रयत्न केला आहे. कादंबरीतील बरेच घटना प्रसंग चित्रपटात वगळले आहेत. कादंबरीमध्ये सुरुवातीला सोमण भटजीचा विस्तृत उल्लेख आलेला आहे परंतु तो चित्रपटात नाही. गणपतरावांच्या वडिलांचा संदर्भ कादंबरीत येतो मात्र तो चित्रपटात दिसत नाही. कादंबरीत आनंदीबाई अशिक्षित आहेत तर चित्रपटात थोडंफार लिहिता-वाचता येतं असं दाखवले आहे. अलीबागेत गोपाळराव व आनंदीबाई जातात तेव्हा त्यांच्यासोबत असणाऱ्या व्यक्ती वेगळ्या दिसतात. आनंदीबाईने अभ्यास केला नाही म्हणून गोपाळराव मारतात तेव्हाचा प्रसंग वेगळा आहे. आनंदीबाई मिशनरी स्कूलमध्ये शिकायला जातात तेव्हाचा प्रसंग वेगळा आहे. आनंदीबाई यांचे डॉक्टरी शिक्षण पूर्ण झाल्यावर त्या समाजसेवा करतात असे कादंबरीत आहे मात्र चित्रपटात पुढील भाग आलेला नाही. चित्रपटात गीते व संगीताच्या माध्यमातून विषय मांडण्याचा प्रयत्न दिसतो.

**मूळ साहित्यकृती आणि माध्यमांतरित कलाकृती :**

**कथानक :**

चरित्र आणि आत्मचरित्र यांचे माध्यमांतर करताना कथानकाचा विचार फार महत्त्वाचा ठरतो. चरित्रात वा आत्मचरित्रात लेखकाने जो मुद्दा मांडलेला आहे त्यापेक्षा वेगळे काही सांगण्याची सोय नसते. कथा, कादंबरीसारख्या काल्पनिक साहित्यकृतीचे माध्यमांतर करताना कथानकाच्या स्तरावर आवश्यकतेनुसार कलात्मक स्वातंत्र्य घेता येते. चरित्रात एखाद्या व्यक्तीच्या आयुष्याचे वर्णन इतर कोणीतरी करते, मात्र आत्मचरित्रात स्वतः त्या व्यक्तीने आपल्या जीवनातील महत्त्वाच्या घटना-प्रसंगांचे वर्णन केलेले असते. त्यामुळे, चरित्रात न आलेल्या परंतु माध्यमांतरकाराला महत्त्वाच्या वाटणाऱ्या घटना-प्रसंगांची मांडणी काहीशा कलात्मक पद्धतीने झाल्यास चालेल; परंतु मूळ कलाकृतीत नसलेले, आपले असे नव्याने काहीतरी भर घालण्याचा किंवा असलेले वगळण्याचा प्रयत्न होता कामा नये.

**वर्णन, भाषाशैली :**

कथा, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र यासारख्या प्रकारांत फक्त शब्दांद्वारे वर्णन करावे लागते. लेखकाच्या मनातील विचार, कथानक, पात्रे आणि त्यांच्या भावना, घटनाप्रसंग, वातावरण निर्मिती या सर्वांचे वर्णन शब्दांतूनच मांडावे लागते. परंतु, चित्रपटात तसे करावे लागत नाही. अनेक गोष्टी दृश्यांच्या माध्यमातूनच प्रेक्षकांना स्पष्टपणे दिसून येत असतात. उदाहरणार्थ पात्रांचे वर्णन, एखाद्या घटनाप्रसंगातील परिस्थितीचे आणि स्थानाचे वर्णन इत्यादी. नाटक व चित्रपट या माध्यमांची अत्यंत महत्त्वाची आणि जमेची बाजू म्हणजे भाषा आणि संवाद. प्रकारांतर-माध्यमांतर करताना मूळ कलाकृतीतील पात्रांच्या भाषेबरहुकुम संवाद चित्रपटात आल्यास ते पात्र अधिक ज्वलंत आणि जिवंत वाटते. नाटक व चित्रपटातून चरित्र व आत्मचरित्राचे सादरीकरण करताना विशेषतः पात्रांच्या तोंडची भाषा ही अतिशय महत्त्वाची ठरते. एखाद्या विशिष्ट प्रादेशिक भागातील पात्र असल्यास त्या पात्राच्या तोंडी येणारी भाषा ही त्याच आशयाची असावी लागते. तशी असल्यास त्या पात्राचा प्रभावीपणा अधिक प्रकर्षाने जाणवतो.

**पात्रे आणि कलाकार निवड :**

चित्रपट या माध्यमाला वेळेची मर्यादा असल्याने मोजक्या संख्येने पात्रे निवडावी लागतात. चरित्र आणि आत्मचरित्रासारख्या साहित्यकृतीचे सादरीकरण करण्यासाठी सर्व पात्रे मूळ व्यक्तिरेखेच्या शक्य तितक्या जवळ जाणारी असावी लागतात. अनेकदा त्याच गोष्टीचा वेगळा दृष्टिकोन ठेवून दिग्दर्शक अन्य पात्रे देखील अधोरेखित करून दाखवण्याची शक्यता असते. ती भूमिका साकारणाऱ्या कलाकाराचे वय मूळ व्यक्तीप्रमाणेच असावे लागते. इथे, एखाद्या कलाकाराच्या अभिनय क्षमतेपेक्षा त्या कलाकाराचे त्या संबंधित व्यक्तिरेखेशी साधर्म्य किती आहे हे अधिक प्राधान्याने पाहावे लागते. एखाद्या चित्रपटात मूळ व्यक्तीच्या लहानपणीचा संदर्भ दाखविण्यात येणार असल्यास त्या हिशेबाने तसा बालकलाकार शोधावा लागतो. मूळ व्यक्तीच्या बालपणीच्या शारीरिक ठेवणीप्रमाणे तसा बालकलाकार निवडावा लागतो. एखादी व्यक्तिरेखा चित्रपटातून जर विशिष्ट बोली बोलणारी असेल तर त्या कलाकाराला त्या बोलीचा पुरेपूर अनुभव आणि प्रभुत्व असावे लागते. त्या पात्राला न्याय देण्यासाठी त्या पात्रानुसार बोलणे, चालणे, हावभाव या गोष्टी तंतोतंत जुळून आल्या तरच ती भूमिका उठावदार ठरते.

## निष्कर्ष

साहित्य असो वा चित्रपट या दोन्हींची अभिव्यक्तीची माध्यमे वेगळी असली तरी दोन्हींचाही उद्देश म्हणजे नाट्यमय पद्धतीने कथानक वर्णन करणे. लिखित साहित्यात वाचकाच्या क्षमतेवर आस्वादाची पातळी अवलंबून असते मात्र चित्रपटात प्रत्यक्ष दृश्य समोर उभे राहत असल्याने प्रेक्षकाला अधिक सखोलपणे आणि प्रभावीपणे त्या गोष्टीचा अनुभव घेता येतो. कथा, कादंबरी, चरित्र वा आत्मचरित्र यासारख्या प्रकारांचे वाचन करताना कथानक, पात्रे, घटनाप्रसंग, वातावरण यांची कल्पना आपापल्या क्षमतेनुसार प्रत्येक वाचकाला करावी लागते. एका वाचकाच्या मनात निर्माण झालेली कल्पना दुसऱ्या वाचकाच्या मनात तशाच प्रकारे तयार होईलच असे नाही. एखाद्या विशिष्ट प्रदेशाचे वर्णन एखाद्या साहित्यकृतीत आलेले असेल आणि त्या प्रदेशाचा तिळमात्रही परिचय एखाद्या वाचकाला नसेल तर त्या कथानक घटनाप्रसंगांची कल्पना करणे त्या वाचकाला अशक्य होईल. चित्रपटात मात्र या गोष्टी थेट समोर सादर होत असल्याने हा प्रश्न उद्भवत नाही. विविध कॅमेरा, तंत्रज्ञान, इत्यादींच्या सहाय्याने प्रभाव पाडणारे चित्रिकरण करता येते. तसेच, चित्रपट निर्माण करताना प्रत्येक दिग्दर्शक कलात्मक स्वातंत्र्य (creative liberty) घेत असतो हे देखील लक्षात येते.

साहित्यकृती आणि चित्रपट या दोन भिन्न गोष्टी आहेत. पुस्तकात व्यापकता येते. तपशीलवार सगळे सांगितले जाते. येथे शब्दांची निवड, वाक्यांचा वापर कशाप्रकारचे कथानक सांगितलं गेले आहे याला महत्त्व असते. चित्रपट हे दृकश्राव्य माध्यम आहे. यातील कथानक तो दिग्दर्शक आणि ती पात्रे कशा पद्धतीने आपल्यापर्यंत पोहोचवतात त्यावर त्याचे यश अवलंबून असते. चित्रपट हा तांत्रिक साहाय्याशिवाय घडवून आणता येत नाही.

साहित्यकृतीचे माध्यमांतर करत असताना घटना प्रसंगांची निवड ही अत्यंत काळजीपूर्वक करावी लागत असते. त्यासाठी थोडे कलात्मक स्वातंत्र्य घेत असताना कथानकाच्या मूळ आशयाला कोणतीही बाधा निर्माण होणार नाही याचीही खबरदारी ही दिग्दर्शकाने आणि इतर सर्व घटकांनी घेणे अत्यावश्यक ठरत असते. लिखित साहित्यप्रकारांतून पात्रे फक्त शब्दांच्या आणि वर्णनाच्या माध्यमातून साकारावी लागत असतात. प्रकारांतर किंवा माध्यमांतर करताना ही पात्रे जिवंत स्वरूपात आपल्यासमोर आपल्याला साकार करता येत असतात. मूळ व्यक्तिरेखेची शारीरिक, मानसिक, वैचारिक, सांस्कृतिक, भाषिक, धार्मिक अशी सर्वांगाने प्रतिकृती त्या कलाकाराला साकारावी लागत असते. अनेकदा मूळ व्यक्तीप्रमाणे दिसण्यासाठी ती भूमिका साकारणाऱ्या कलावंताला स्वत:मध्ये अनेक बदल करावे लागतात. मूळ व्यक्तीने

भोगलेल्या वेदना, अनुभवलेले प्रसंग यांची शक्य ती प्रत्यक्ष जाणीव त्या कलाकाराला झाल्यास ती भूमिका साकारणे अधिक प्रभावी ठरते. मूळ व्यक्तिरेखेचा शक्य तितका सखोल अभ्यास करणे हेही भूमिका साकारणाऱ्या कलाकाराच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते.

मराठीत अनेक साहित्यकृती प्रकारांतरित व माध्यमांतरित झालेल्या आहेत. एखादे पुस्तक वाचून त्यातील सर्व गोष्टी वाचकाला समजतीलच याची शक्यता नसते परंतु तोच आशय नाटक किंवा चित्रपट रूपात दाखवल्यास तो अधिक प्रभावीपणे पोहोचवता येत असतो.

मूळ साहित्यकृतीत कोणत्या उणीव आहेत, आशयात कोणता बदल करावयाचा आहे, नवे कोणते विषय मांडावयाचे आहेत या सर्वांचा विचार करून प्रकारांतर, माध्यमांतर करावे लागत असते. आधुनिक काळात वाचनापेक्षा चित्रपट आणि नाटक या माध्यमांना लोकांचा मिळणारा अधिक प्रतिसाद लक्षात घेता प्रकारांतर आणि माध्यमांतर अधिक प्रभावी असणे गरजेचे ठरते.

संदर्भ :

१. थोरात राजेंद्र, कसबेकर, आशुतोष, 'साहित्यकृतीचे माध्यमांतर', संस्कृती प्रकाशन, पुणे, २०१७
२. तायवाडे शरयू, वाटाणे, राजेंद्र, ठाकरे, कोमल, 'साहित्य प्रकारांतर समीक्षा आणि सिद्धांत', विजय प्रकाशन, नागपूर २०१८
३. आमटे प्रकाश, 'प्रकाशवाटा', समकालीन प्रकाशन, पुणे, २०१८
४. सपकाळ सिंधुताई (ममता), मी वनवासी, रिया पब्लिकेशन्स, पुणे, २०१३
५. व्हटकर अशोक, '७२ मैल', पॉप्युलर प्रकाशन, पुणे, २०१६
६. घाणेकर कांचन, 'नाथ हा माझा', मेहता पब्लिशिंग हाऊस, १९८९
७. साने पांडुरंग, 'श्यामची आई', १९३६
८. जोशी, श्री. ज., 'आनंदी गोपाळ', १९७०
९. 'डॉ. प्रकाश बाबा आमटे' - द रियल हिरो (चित्रपट), दिग्द. समृद्धी पोरे, २०१४
१०. 'मी सिंधुताई सपकाळ' (चित्रपट), दिग्द. अनंत नारायण महादेवन, २०१०
११. '७२ मैल - एक प्रवास' (चित्रपट), दिग्द. राजीव पाटील, २०१३
१२. 'आणि... डॉ. काशिनाथ घाणेकर' (चित्रपट), दिग्द. अभिजीत देशपांडे, २०१८
१३. 'स्यामची आई', दिग्द. प्रल्हाद केशव अत्रे, १९५३
१४. 'आनंदी गोपाळ', दिग्द. समीर विद्वांस, २०१९

■

# लेखन कार्यशाळेतील काही क्षणचित्रे







